**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे - ३३
**दुरध्वनी क्र.** ०२०-२७३५०१२० ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट

## रहिवासी परिसरात लोकांच्या जिवीतास धोका निर्माण करुन घरगुती गॅसची काळाबाजरी करणा-या इसमास गुन्हे शाखा युनिट १ ने ठोकल्या बेडया लहान-मोठया घरगुती गॅस टाक्यांसह ४८,५००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त

मा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे सो यांनी गुन्हे शाखा युनिट १ चे पोनि जितेंद्र कदम, अतिरीक्त प्रभार, यांना गुन्हे शाखा युनिट १ हद्दीतील अवैध धंदयांवर ठोस कारवाई करण्याचे आदेश दिल्यावरुन पोउपनि इम्रान शेख, पो.अंमलदार फारुक मुल्ला, प्रमोद हिरळकर, विशाल भोईर मारुती जायभाय, स्वप्नील महाले असे पथक नेमुण सदर अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी आदेश देण्यात आले.

पोउपनि शेख व पथक यांना त्यांच्या खास बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, भोसरी पोलीस ठाणे हद्दीत एक इसम रहीवासी परिसरात लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने घरगुती गॅसची काळाबाजारी करीत आहे. वगैरे मजकुरचे मिळाले माहिती वरून सदर बातमीच्या अनुशंगाने भगतवस्ती, साधना कॉम्पलेक्स, भोसरी, पुणे येथील लक्ष्मी गॅस इंटरप्रायजेस दुकानामध्ये पडताळणी केली असता एक इसम घरगुती गॅसच्या मोठया टाकी मधील गॅस लहान टाक्यांमध्ये भरुन विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले. सदरबाबत पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करुन इसम नामे **परमेश्वर दयानंद माने, वय-२६ वर्षे, रा सचिन माने यांचे घर, धावडेवस्ती, रवी लांडगे यांचे घरजवळ, भोसरी पुणे मुळ रा आंबेगाव, ता देवणी, जि लातुर** यास ताब्यात घेवुन त्याच्या कडुन **१० घरगुती गॅसच्या मोठया टाक्या, २८ गॅसच्या लहान टाक्या एकुण ३८ गॅस टाक्या, २ गॅस विड्रॉल मशीन, एक वजनकाटा असा एकुण ४८,५००/- रुपयांचा मुद्देमाल** जप्त करण्यात आला.

इसम नामे परमेश्वर दयानंद माने हा भरलेल्या सिलेंडर टाक्या मधुन लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल हे माहित असुन सुध्दा मानवी जिवीतास पोहचणा-या कोणत्याही संभाव्य धोक्यापासुन सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करणे गरजेचे असताना ज्वालाग्राही पदार्थाबाबत पुरेसा इतका बंदोबस्त करण्याचे जाणीवपुर्वक टाळुन, त्याचे ताब्यातील जिवनावश्यक वस्तु, भरलेल्या घरगुती सिलेंडरमधील गॅस लहान गॅस टाक्यामध्ये विनापरवाना भरुन सदरचे गॅस चढया व्यावसायीक दराने विक्री करताना मिळुन आला. म्हणुन त्याच्या विरुध्द भादवी कलम २८५, सह जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३,७ सह पुरवठा व वितरण नियमन आदेश २००० चे कलम ३,४,५,६,७ प्रमाणे भोसरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद आरोपीस पुढील कारवाई कामी भोसरी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्याला घरगुती गॅस पुरवठा करणा-या इसमांबाबत अधिक तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त मनोज लोहिया, अप्पर पोलीस आयुक्त संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, पोलीस उपनिरीक्षक इम्रान शेख पो.अंमलदार फारुक मुल्ला, प्रमोद हिरळकर, विशाल भोईर, मारुती जायभाय, स्वप्नील महाले यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,पुणे